महाराष्ट्र मंडळ लंडन यांच्या सोबत झालेल्या सामंजस्य कराराची अंमलबजावणी करण्यासाठी शालेय शिक्षण व क्रीडा विभागांतर्गत कार्यालयांची जबाबदारी निश्चित करणे व समन्वय समिती स्थापन करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक:संकिर्ण-२०२४/प्र.क्र.४८/एसडी-४
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनाक:-१० जूलै, २०२४

प्रस्तावना:-

समृद्ध वारसा लाभलेल्या विविध भारतीय भाषांचा विकास करणे, हे भाषिक तत्त्वावरील राज्यांची पुनर्रचना करण्यामागचे मुलभूत तत्त्वज्ञान आहे. भाषिक तत्त्वानुसार मराठी भाषा ही महाराष्ट्र राज्याची राजभाषा असून (महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४) ती एक प्राचीन विकसित भाषा आहे. मराठी भाषेने राज्याला सांस्कृतिक, सामाजिक ओळख निर्माण करून दिली असून त्या भाषेचे जतन व विकास करण्यासाठी राज्य वचनबद्ध आहे. विविध क्षेत्रात मराठीचा होणारा वापर अधिकाधिक गुणवत्तापूर्ण होण्याच्या दृष्टीकोनातून राज्यामध्ये केंद्र शासन कार्यालयात, राज्य शासन कार्यालयात, न्यायालयीन कामकाज व दैनंदीन व्यवहार यामध्ये मराठी भाषेचा वापर करण्यात येत आहे.

याचबरोबर परदेशी विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृतीची ओळख व्हावी आणि मराठी भाषा समजावी, टिकून राहावी तसेच मराठी भाषेचा प्रचार व्हावा यासाठी अनेक संस्था, मंडळ प्रयत्नशील आहेत. महाराष्ट्र मंडळ, लंडन हे तेथील मराठी भाषेच्या प्रचार व प्रसार या कार्यासाठी अनेक वर्षांपासून काम करीत आहे. भाषा व संस्कृतीच्या क्षेत्रात मराठी भाषेची अभिवृध्दी करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र मंडळ, लंडन यांच्या सोबत माहे जानेवारी २०२४ मध्ये सामंजस्य करार करण्यात आला आहे. सदर सामंजस्य कराराची अमंलबजावणी करण्यासाठी शालेय शिक्षण व क्रीडा विभागांतर्गत कार्यालयाची जबाबदारी निश्चित करणे व समन्वय समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती.

शासन निर्णय :-

परदेशातील विद्यार्थ्यांना मराठी भाषा समजावी, टिकून राहावी, मराठी भाषेचा प्रचार व्हावा यासाठी लंडन येथील मराठी भाषा शिकण्याची आवड असणाऱ्या मुलांचा शोध घेणे, त्यांची माहिती संकलित करणे, पाठ्यपुस्तक पुरवणे, अध्यापन करणे, परीक्षा घेण्याकरिता यंत्रणा निर्माण करणे, इयत्ता १ ली ते ५ वी च्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेणे, प्रश्नपत्रिकांची पडताळणी करून प्राप्त श्रेणी नुसार इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांना राज्य बोर्डामार्फत प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे व प्रमाणपत्राचे वाटप करणे इत्यादी बाबी सुलभ होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र मंडळ, लंडन आणि शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन यांच्यामध्ये माहे जानेवारी २०२४ मध्ये सामंजस्य करार करण्यात आला आहे. सदर सामंजस्य कराराची अमंलबजावणी

करण्यासाठी शालेय शिक्षण विभागांतर्गत विविध कार्यालयाची जबाबदारी निश्चित करण्यास व समन्वय समिती स्थापन करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. वरील नमूद सामंजस्य कराराची अमंलबजावणी करण्यासाठी शालेय शिक्षण विभागांतर्गत असणाऱ्या विविध कार्यालयांची जबाबदारी खालील प्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

अ) महाराष्ट्र मंडळ, लंडन यांचे मार्फत मराठी भाषा शिकत असणाऱ्या इयत्ता १ ली ते ५ वीच्या विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे (बालभारती) यांचे मार्फत पाठ्यपुस्तकांचा पुरवठा करण्यात येईल.

ब) महाराष्ट्र मंडळ, लंडन यांना स्थानिक गरजेनुसार आवश्यक असल्यास पाठ्यपुस्तकांमध्ये २०% पर्यंत बदल करून देण्याचे अधिकार महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,पुणे (बालभारती) यांना राहतील.

क) राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र ,पुणे यांचे मार्फत प्रश्नपत्रिका तयार करणे तसेच आवश्यकतेनुसार महाराष्ट्र मंडळ, लंडन यांच्या शिक्षकांना प्रशिक्षण देण्याची जबाबदारी राहील.

ड) महाराष्ट्र मंडळ, लंडन यांच्या शाळेतील इयत्ता ५ वीच्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांची राहील.

इ) सदर सामजस्य कराराची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने शासनाकडून कोणत्याही प्रकारचे आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.

३. महाराष्ट्र मंडळ, लंडन यांच्यामार्फत चालविल्या जात असलेल्या शाळेमधील विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेचा प्रसार करणे, त्यांना अभ्यासक्रम, पुस्तक उपलब्ध करून देणे, परीक्षा घेणे, प्रमाणपत्र देणे इत्यादी कामकाजाचा नियमित आढावा घेणे, सनियंत्रण करणे, आवश्यक ते नियोजन करणे व योग्य निर्णय घेणे यासाठी खालील प्रमाणे समन्वय समिती गठीत करण्यात येत आहे.

समन्वय समिती :-

अ. क्र.	समितीतील पद	अधिकाऱ्याचे पदनाम व कार्यालय
१	अध्यक्ष	संचालक,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र ,पुणे
२	सदस्य	अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे
३	सदस्य	संचालक,महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,पुणे
४	सदस्य	संचालक, राज्य मराठी विकास संस्था
५	सदस्य	प्रमुख विश्वस्त महाराष्ट्र मंडळ, लंडन
६	सदस्य	विश्वस्त महाराष्ट्र मंडळ, लंडन
७	सदस्य	अध्यक्ष, महाराष्ट्र मंडळ, लंडन
८	सदस्य	सदस्य , महाराष्ट्र मंडळ, लंडन
९	सदस्य	सदस्य , महाराष्ट्र मंडळ, लंडन
१०	सदस्य सचिव	उप संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र ,पुणे

४. **समन्वय समितीची कार्य**

अ) एक महिन्यातून एकदा ऑनलाईन बैठक घेण्यात येईल आणि सदर बैठकीत प्रगतीचा व केलेल्या कामकाजाचा आढावा घेण्यात येईल.

ब) उपक्रमाची उद्दिष्टे साधण्यासाठी गरजेनुसार चर्चासत्रांचे आयोजन करण्यात येईल.

क) सदर उपक्रमामध्ये बदल करण्याची आवश्यकता असल्यास बदल करण्याचे अधिकार शासनाच्या मान्यतेने समन्वय समितीस असतील.

५. सदर उपक्रमाबाबत संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे हे समन्वय साधतील.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०७१०१५४३५४३३२१ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

TUSHAR VASANT MAHAJAN

Digitally signed by TUSHAR VASANT MAHAJAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT, 2.5.4.20=19c6c23f510a80926e9b7ee5db235979452f3f9e8918118634069a6cc7a22b9f, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1A39CEF3C1578 9EE6A2ABE5779ACF233682613F7B9C335D6BF4877267695CECA, cn=TUSHAR VASANT MAHAJAN
Date: 2024.07.10 15:54:52 +05'30'

(तुषार महाजन)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा. उप मुख्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. अध्यक्ष, विधानसभा, महाराष्ट्र, मुंबई,
६. मा. सभापती, विधानपरिषद, महाराष्ट्र, मुंबई,
७. मा. मंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी, मंत्रालय, मुंबई-३२.
८. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
९. आयुक्त (शिक्षण),महाराष्ट्र राज्य ,पुणे
१०. संचालक,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र ,पुणे
११. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ ,पुणे
१२. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती, पुणे
१३. संचालक, राज्य मराठी विकास संस्था
१४. निवड नस्ती (एसडी-४)